साप्ताहिक

# परिवर्तनाच्या पाऊलखूणा

मुख्य संपादक : हरेश वि. दंडाले (मो.९६२३५३६३८८) E-Mail - ppnewspune@gmail.com
* Title RNI TC . No.MAHMAR52725 * Decl.SDM/SR/55/2023

* वर्ष १ * अंक २६ वा * सोमवार २६ फेब्रुवारी २०२४ ते ०३ मार्च २०२४ * पाने ४ * किंमत २ रूपये

YEAR - 1 PRINT - 26 Monday 26 Febuary 2024 To 03 March 2024 PAGE ४ PRICE- 2 RUPEES

## आरक्षणसाठी उपोषणाला बसलेले जरांगे पाटील यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप

**जालना :** मराठा आरक्षणसाठी अंतरवाली सराटीत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. फडणवीस मला बदनाम करण्याचा प्रयत्न करतायत. त्यासाठी ते कट रचत आहेत. सलाईनमध्ये विष देऊन मला मारण्याचा विचार चालू आहे. माझे एन्काऊंटर करण्याचा फडणवीसांचा प्रयत्न आहे. असे गंभीर स्वरुपाचे आरोप जरांगे यांनी केले आहेत. ते आज (२५ फेब्रुवारी) अंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलकांना उद्देशून



बोलत होते. यावेळी बोलताना जरांगे यांनी राज्यात घडलेल्या वेगवेगळ्या राजकीय घडामोडींचा पाढाच वाचला. त्यांनी अनेक नेत्यांवर दबाव टाकला, असे जरांगे म्हणाले. तसेच फडणवीसांनी माझ्याविरोधात षडयंत्र रचायला सुरुवात केली आहे. मात्र मी घाबरणार नाही. मी फडणवीसांचा ब्राह्मणी कावा चालू देणार नाही, असंदेखील जरांगे फडणवीसांना उद्देशून म्हणाले.

जरांगे यांनी राष्ट्रवादीतील (अजित पवार गट) काही नेत्यांची नावे घेत या नेत्यांवर फडणवीसांनी दबाव टाकला. त्यांना शरद पवारांची साथ सोडण्यास भाग पाडले, असाही आरोप केला. जीव जरी गेला, फासावर लटकवलं तरी प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादी सोडू शकत नव्हते. मात्र प्रफुल्ल पटेल यांना तुरुंगाची भीती घालण्यात आली. त्यामुळे त्यांना राष्ट्रवादी पक्ष सोडून भाजपाशी हातमिळवणी करावी लागली. अजित पवार हे कधीच राष्ट्रवादीला सोडू शकत नव्हते. पण तुरुंगात जाण्यापेक्षा भाजपाशी हातमिळवणी केलेली बरी, म्हणून अजित पवार राष्ट्रवादीतून बाहेर पडले.

### फडणवीसांमुळे अनेकांना भाजपा सोडण्याची वेळ

*माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातोय. यामागे देवेंद्र फडणवीस आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या मनात आले तर राज्यात काहीच होऊ शकत नाही. फडणवीसांचं न ऐकल्यावर काय होतं, ते तुम्हाला सांगतो. जो माणूस स्वत:चा पक्ष कधीच सोडू शकत नाही, अशा लोकांवर फडणवीसांमुळे भाजपा सोडण्याची वेळ आली. एकनाथ खडसे यांच्यावर फडणवीसांमुळे भाजपा सोडण्याची वेळ आली. विनोद तावडे महाराष्ट्रातून कधीच बाहेर जाणार नव्हते. मात्र त्यांना दिल्लीला जावे लागले. नाना पटोले यांनादेखील फडणवीसांमुळे भाजपा सोडून जावे लागले. पंकजा मुंडे आयुष्यातही भाजपा सोडण्याचा विचार करू शकत नाहीत. मात्र भाजपात त्यांची घुसमट होत आहे. फडणवीस हे महादेव जानकर यांना धनगरांचा नेता म्हणून मोठं होऊ देत नाहीयेत, असे जरांगे म्हणाले.*






# संपादकीय...

## बदमाषांतले शरीफ!

वर्षानुवर्षांच्या दडपशाही आणि हडपशाहीविरोधात पाकिस्तानी जनतेने ८ फेब्रुवारी रोजी दिलेला काहीसा अनपेक्षित कौल आणि त्यातून उसळलेली चैतन्यलाट औट घटकेची ठरणार अशी भीती होती. घडलेही तसेच. 'बॅट' हे चिन्ह हिरावल्यानंतरही पाकिस्तानातील युवा मतदारांची दिशाभूल झाली नाही. पाकिस्तान मुस्लीम लीग- नवाझ (पीएमएल-एन) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) या राजकीय खानदानचालित पक्षांना त्यांचे मोजके निष्ठावान मतदार वगळता बाकीच्यांनी नाकारले. शरीफ बंधूंना मखरात बसवायचे तेथील लष्कराने जणू ठरवूनच टाकल्याचे दिसताच, जाणत्या मतदारांनी त्यांचे मनसुबे उधळून लावण्यासाठीदेखील मतदान केले. परिणामी एके काळच्या दोन बलाढ्य पक्षांना पाकिस्तानात सत्तास्थापनेसाठी परस्परांचे खांदे आणि लष्कराच्या कुबड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. या निकालांचे सखोल विश्लेषण झाल्यानंतर निव्वळ सुशिक्षित युवा मतदारच नव्हे, खैबर पख्तुनख्वासारख्या डोंगराळ, अर्धशिक्षित भागातील मतदारांनीही इम्रान खान यांच्या 'पाकिस्तान ते-हरीक-इ-इन्साफ' (पीटीआय) पक्षाने अपक्ष म्हणून उतरवलेल्या उमेदवारांना भरभरून मतदान केल्याचे आढळून आले. अशा बहुतेक अर्धशिक्षित मतदारांची दिशाभूल व्हावी यासाठीच 'बॅट' हे परिचित चिन्ह हिरावून घेण्याचा अजागळ डाव रचण्यात आला, तोही साफ फसला. पीटीआयच्या उमेदवारांची संख्या १००च्या जवळपास पोहोचली. तर पीएमएल (एन) पक्ष कसाबसा पंचाहत्तरीपर्यंत आणि पीपीपी जेमतेम पन्नाशीपार पोहोचला. नवीन नॅशनल असेम्ब्लीत दोनपैकी एकाही पक्षाचे संख्याबळ १३३ या आवश्यक आकड्यापर्यंत पोहोचत नसले, तरी आघाडी म्हणून आकडे जुळणीची सर्वाधिक संधी यांनाच आहे. शिवाय धाकटे शरीफ शाहबाझ हे पंतप्रधानपदाचे आणि बेनझीर भुत्तोंचे पती आसिफ अली झरदारी अध्यक्षपदाचे उमेदवार राहातील असा समझोता झाल्यामुळे या दोन पक्षांचे आघाडी सरकार उदयाला येईल, अशी चिन्हे आहेत. इम्रान खान यांना पंतप्रधानपदावरून दूर करण्यासाठी गेल्या वर्षीही हे दोन पक्ष एकत्र आले होते. परंतु त्यावेळच्या आणि आताच्या आघाडी सरकारमध्ये मूलभूत फरक असेल. पीपीपी त्यावेळी प्रत्यक्ष सरकारमध्ये सहभागी होते. यावेळी त्यांनी सरकारमध्ये सहभागी होण्याऐवजी निव्वळ सभागृहात सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. यातच आगामी सरकारच्या अस्थिर भवितव्याची बीजे पेरली गेलेली दिसतात.

कारण अर्थव्यवस्थेचे मोडलेले गाडे हाकण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून तातडीची मदत मिळवणे हे नव्या सरकारचे प्राधान्य राहील. 'लोकसत्ता'ने गुरुवारीच याविषयी 'कर्जफेडीच्या विळख्यात पाकिस्तान' या अन्वयार्थामधून आव्हानांचा आढावा घेतला होता. मदत मिळवणे हे फारसे अवघड नाही. सध्या जी मदत सुरू आहे, ती आणण्यासाठी गतवर्षी काळजीवाहू सरकारनेच वाटाघाटी केल्या होत्या. मदत पदरात पाडून घेण्यासाठी ज्या जाचक अटींचे पालन करावे लागणार, त्या विलक्षण असंतोषमूलक राहतील. त्या अमलात आणण्याचे पातक शरीफ सरकारच्या माथी मारले जाणार. मुळात निवडणूक निकालांचे 'हनन' केल्याबद्दल मोठ्या प्रमाणात मतदारांची नाराजी सरकारवर राहीलच. जीवनावश्यक वस्तू, इंधन, खते, औषधे यांचे दर कडाडल्यामुळे आजचा दिवस पुढे ढकलणे लाखोंसाठी जिकिरीचे बनले आहे. कल्याणकारी उद्देशासाठी निधी सैल सोडायचा, तर तो इतर चंगळवादी आस्थापनांसाठी गोठवावा लागेल. हा वर्ग म्हणजे लष्कर आणि जमीनदारांचा. त्यांचा दोन प्रमुख राजकीय पक्षांवर पगडा. हा वर्ग काटकसरीचे उपाय सहजी मान्य करणाऱ्यांपैकी नाहीच. तेथे थेट संघर्षाची चिन्हे दिसून येतात.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा प्रत्यक्ष सरकारच्या रचनेचा. पीपीपीचे बिलावल भुत्तो यांनी यंदा सरकारमध्ये सामील न होण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वेळी 'प्रोग्रेसिव्ह डेमोक्रॅटिक मूव्हमेंट' या नावाखाली स्थापन झालेल्या आघाडी सरकारमध्ये पीपीपी सहभागी होता. भुत्तो त्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री होते. याही वेळी त्यांनी सुरुवातीस थेट पंतप्रधानपदाची मागणी करून पाहिली, ती अर्थातच मान्य झाली नाही. आता भुत्तो यांनी वेगळीच चाल खेळलेली दिसते. आपले पन्नासेक असेम्ब्ली सदस्य सरकार स्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतील याची जाणीव त्यांना झालेली आहे. आमच्या पाठिंब्याशिवाय कोणतेही सरकार बनणार नाही, असे त्यांनी म्हटले होतेच. महत्त्वाच्या आणि विशेषतः काटकसरीच्या विधेयकावर शरीफ यांच्याशी मतभेद झाल्यास सरकारचा पाठिंबा काढण्याचा त्यांचा मार्ग मोकळा आहे. पीटीआयचे सदस्य यंदा सुन्नी इत्तेहाद कौन्सिल या जहाल संघटनेमध्ये सामील झाले आहेत, ज्यामुळे त्यांना नॅशनल असेम्ब्लीत एक गट म्हणून बसता येईल. बिलावल भुत्तो इम्रान यांच्या या नवीन गटासह सरकार स्थापण्याची शक्यता अजिबात अतर्क्य नाही.

## चिंता




चिंता आपल्या पैकी अनेक जण आयुष्यातल्या वेगवेगळ्या टप्प्यात अनुभवायला येत असतात.

पालकांना मुलांची चिंता,मुलांना कामाची किंवा नोकरीसाठीची चिंता,कधी नात्यासाठीची चिंता,कधी लोकांना काय वाटेल ह्याची चिंता, पुढे व्यवस्थित होईल का ह्याची काळजी, तर कधी तब्येती ची काळजी.

डोक्यात सतत तेच विचार येत राहतात ,कामावर नीट लक्ष लागत नाही,डोकं दुखणे ,इतर काही करावास वाटत नाही

चिंतेची काही कारणे
मोठे बदल
वारंवार येणारे आजारपण
खूप जबाबदार्या असणे
आपल्याला हवे तसे मनाप्रमाणे काहीच होत नसते
भीती वाटत असलेल्या गोष्टींना सामोरे जाणे
अन्याय व अपमान सहन करणे
आजारपण

आपण काय करू शकतो
विश्वासू व्यक्ती जवळ व्यक्त होणे

आपल्या क्षमता, चांगले गुण,आपले लोक ह्यांची यादी बनवून त्यांच्या सहाय्यने काही मार्ग निघत आहे का पाहणे

जर परिस्थिती बदलण्यासारखी नसेल तर तिचा सामना करण्यासाठी काय करता येईल हा विचार करणे

चिंता कधी कधी आपल्याला अतिरेकी किंवा अव-ास्तव विचारांकडे घेऊन जाते-वास्तवात खरच काय होऊ शकेल हे आपण पाहू शकता

शरीराची काळजी व आपल्या मनाला बरे वाटवून देणाऱ्या गोष्टी आपल्या रोजच्या दिनक्रमात आणणे गरजेचे आहे

खूप काळापासुन हे होत असेल तर तज्ञाची मदत घ्या.

तुम्ही मोफत मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाईन ला सुद्धा मोकळेपणाने करायला व चिंता दूर करायला फोन लाऊ शकता

**सोमवार ते शनिवार**
**दुपारी १२ ते रात्री ८**
**७८८७८८९८८२**

## हाच खेळ पुन्हा उद्या..!

बोलाच्याच भातावर घातलेली बोलाचीच कढी खाऊन पोट भरले असे मानायचे असेल तर नंतरचा ढेकरही बोलाचाच असणार! महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात मंगळवारी मराठा आरक्षणाचे विधेयक एकमुखाने मंजूर झाल्यानंतर प्रांगणात फुटलेले लाखा-दोन लाखांचे फटाके हे असे बोलाच्या यशाचे होते. सत्ताधारी कोणत्याही पक्षाचा असो. त्यास आपण गहनातील गहन समस्या सोडवली असे मानणे नेहमीच आवडते. या समस्या खरोखरच सुटल्याची दिवास्वप्ने हे सत्ताधीश रंगवतात. विद्यमान महाराष्ट्र सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर यापेक्षा काही विशेष वेगळे वागत आहे असे नाही. मराठा समाजास स्वतंत्रपणे, म्हणजे अन्य मागास जाती (ओबीसी) वर्गाच्या बाहेर, १० टक्के आरक्षण देण्याचा आपला निर्णय हा मराठा आरक्षणाची समस्या सोडवणारा आहे, असे सरकारचे म्हणणे आणि ते समस्त राज्याने मान्य करावे असा सरकारचा आग्रह. त्यावर विश्वास ठेवणे अवघड. याचे कारण हा निर्णय पहिल्यांदाच घेतला गेला आहे, असे नाही. प्रत्येक वेळी तो घेताना विद्यमान मुख्यमंत्र्यांप्रमाणेच त्या त्या काळातील मुख्यमंत्र्यांनीही ही समस्या सोडविल्याचा आनंद साजरा केला होता. त्या आनंदाचे पुढे काय झाले, हे सर्व राज्य जाणतेच. त्यामुळे सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांस आपण हे आव्हान खरोखरच पेलले असे वाटत असले तरी त्यांच्याही आनंदाचे यापेक्षा काही वेगळे होईल, अशी शक्यता नाही. ते का, याचा विचार व्हायला हवा. त्याची प्रमुख कारणे दोन. एक म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी घालून दिलेली मर्यादा आणि दुसरे म्हणजे ती ओलांडण्यासाठी राज्य सरकारने दाखवलेली चतुर घाई. या आधी २०१९ साली मराठा समाजास आरक्षण नाकारताना सर्वोच्च न्यायालयाने यामुळे राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांहून अधिक होईल याकडे निर्देश केला केला होता. तत्कालीन सरकारने घेतलेल्या अशाच आरक्षण निर्णयाविरोधात २०१९ च्या जूनमध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर झाली. तो प्रयत्न सपशेल अयशस्वी ठरला. या अपयशाचे भाकीत 'लोकसत्ता'नेही वर्तवले होते. कारण त्यासाठी एकंदरच आरक्षण-मर्यादा ५० टक्क्यांहून जास्त नसावी याबाबत तसेच बिगर-अनुसूचित पण मागास जातींच्या आरक्षणांबद्दल पथदर्शी ठरणाऱ्या इंद्रा साहनी निकालाचा फेरविचार करावा लागेल. त्यासाठी अधिक मोठे घटनापीठ स्थापन करावे लागेल. कारण 'मंडल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इंद्रा साहनी खटल्याचा निकाल नऊ जणांच्या पीठाने दिला. त्याचा फेरविचार करायचा म्हणजे आता याप्रकरणी ११ न्यायाधीशांचे घटनापीठ गठीत करावे लागेल. तसे काही आता झालेले नाही. होण्याची शक्यताही नाही. गेल्या खेपेच्या तुलनेत या वेळी महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी जरा जास्त प्रयत्न केले हे खरे. पण ते पुरेसे नाहीत. गेल्या खेपेस इंद्रा साहनी निकालाने तेव्हा घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा आता फेरविचारास पात्र ठरते, असा दावा महाराष्ट्र सरकारच्या वतीने त्यावेळी न्यायालयात केला गेला. त्यास आधार म्हणजे साहनी खटल्याच्याच निकालपत्रातील एका वाक्य. या निकालाचा फेरविचार काळाच्या ओघात होऊ शकतो, हे वाक्य यापूर्वीही अनेक जातींच्या आरक्षण-मागण्यांसंदर्भात उद्धृत झालेले आहे. पण तसे करायचे तर एकटे महाराष्ट्र सरकार त्यास समर्थ नाही. कारण अशी काही महत्त्वाची घटनादुरुस्ती एका समाजासाठी एका राज्यापुरती होऊ शकत नाही. म्हणजेच त्यासाठी बहुराज्यीय प्रयत्न हवेत आणि त्यासाठी पुढाकार मध्यवर्ती सरकारलाच घ्यावा लागेल. सबब महाराष्ट्र सरकारला वाटले म्हणून हे आरक्षण प्रत्यक्षात येणार नाही.

आणि दुसरे असे की राजकीय हेतूने प्रेरित आरक्षणाचा मुद्दा देशात कोठेही सुटलेला नाही. महाराष्ट्रात मराठा समाज, गुजरातेत पाटीदार, हरयाणात जाट, आंध्र प्रदेशात कुप्पु आणि राजस्थानात गुज्जर अशा अनेक राज्यांतील अनेकांस आरक्षण हवे आहे. यातील काहींचा प्रश्न १०३व्या घटनादुरुस्तीद्वारे केंद्र सरकारने सोडवला आणि त्यांना आर्थिक मागास या नव्या प्रवर्गांतर्गत आरक्षण मिळेल अशी व्यवस्था केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या निवडणुकांच्या तोंडावर यासाठी पुढाकार घेतला होता. त्याचे राजकीय फळ त्यांना मिळाले. पण महाराष्ट्रात मराठ्यांस आर्थिक मागास प्रवर्गातून आरक्षण नको आहे. तसे ते देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री शिंदे करताना दिसतात. ते ठीक. पण हा प्रयत्न यशस्वी झाला तर त्याचे श्रेय भाजपस नव्हे, तर शिंदे यांच्या शिवसेनेस मिळेल. भाजप हे कसे होऊ देईल, हा यातील साधा राजकीय प्रश्न. म्हणजे मराठा समाजास भाजपकडे आकृष्ट करण्यासाठी त्या पक्षाचे देवेंद्र फडणवीस यांनी केलेला मोठा महत्त्वाकांक्षी प्रयत्न अयशस्वी ठरला. सद्य:स्थितीत भाजप आणि फडणवीस हे सरकारात आहेत. पण अर्थातच चालकाच्या भूमिकेत नाहीत. उलट फडणवीस आणि त्यांचा पक्ष आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांच्या शिव्याशापांचे धनी होताना दिसतात. ते योग्य की अयोग्य हा मुद्दा वेगळा. पण दिसते ते चित्र असे आहे. अशावेळी मराठा समाजास आरक्षण मिळवून देण्याचे पूर्ण श्रेय भाजपास मिळणार नसेल, तर हे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी त्या पक्षाचे नेतृत्व का प्रयत्न करेल? तसे उघड प्रयत्न त्या पक्षाने न करण्याचे आणखी एक कारण म्हणजे 'ओबीसी' समाजावर भाजपचे असलेले राजकीय प्रभुत्व. उच्चवर्णीय आणि ओबीसी हा भाजपचा मुख्य आधार. त्यामुळे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांची इच्छा आहे.

* PARIVARTANACHI PAVOL KHUNA THIS WEEKLY WONER , PRINTER PUBILSHER, and Editor SHREE HARESH VIJAYKUMAR DANDALI, SHREE SAMARTH PRINTERS, 680 BUDHAWAR PETH, TAL. HAVELI, DIST. PUNE - 411002, ( MAHARASHTRA) and PUBLISHED, BHEKRAI NAGAR, PHURSUNGI, TAL- HAVELI, DIST- PUNE-412308

❋ हे साप्ताहिक मालक, व मुद्रक, श्री. हरेश विजयकुमार दंडाले यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ६८० बुधवार पेठ, ता. हवेली, जि. पुणे - ४११००२, (महाराष्ट्र) येथे छापून सर्व्हे नं. २१५, फुरसुंगी ता. हवेली जि. पुणे-४१२३०८ येथे प्रकाशित केले.

संपादक : हरेश विजयकुमार दंडाले मो. नं. : ९६२३५३६३८८

# पुणे मनपा सफाई कामगार यांनी सोन्याची अंगठी मुंढवा पोलीस ठाणे येथे केली जमा

## सफाई कामगाराचे कौतुक करुन त्यांचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महेश बोळकोटगी यांनी केला सत्कार

**पुणे (प्रतिनिधी) :** मुंढवा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात पुणे महानगर पालिका कडील कष्टकरी सफाई कामगार प्रदीप सुरेश गायकवाड, वय ४२ वर्षे, रा. आनंद निवांत, मुंढवा, पुणे हे मुंढवागाव भागामध्ये झाडू मारुन कचरा गोळा करीत असतांना कचऱ्यामध्ये सोन्याची अंगठी सापडली, त्यांनी कोण-ताही लोभ न करता, सफाई कामगार यांनी सदर ठिकाणी आजू बाजूच्या रहीवाशी नागरिकांकडे विचारपुस केली असता श्री. अमोल अनिल बाळकृष्ण घुमे, वय ६० वर्षे, रा. दत्त मंदीर चौक, मुंढवागाव पुणे यांची असल्याची माहिती मिळाल्याने योग्य खातरजमा करणे करीता सफाई कामगार प्रदीप गायकवाड हे अमोल घुमे यांना पोलीस ठाणे येथे घेवून आले.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महेश बोळकोटगी यांनी प्रथम सफाई कामगार प्रदीप गायकवाड यांचे इमानदारीचे कौतुक केले.

तसेच सदर सोन्याचे अंगठी बाबत योग्य खातरजमा करुन परत करणे करिता पोलीस उपनिरीक्षक, अर्जुन नाईकवाडे यांना सुचना दिल्या त्याप्रमाणे योग्य खात्री करुन सदरची सोन्याची ०५ ग्राम वजनाची अंदाजे ३०,०००/- रु. किंमतीची अंगठी मुळ मालकास परत करण्यात आली आहे. सदरची सोन्याची अंगठी परत मिळाल्याने श्री. अमोल घुमे व इतर स्थानिक नागरिक यांनी सफाई कामगार प्रदीप गायकवाड यांचे व पोलीस दलाचे कौतुक केले आहे.

सफाई कामगार प्रदीप गायकवाड यांनी त्यांचे हालाकीचे व गरीब परिस्थिती व कष्टाचे काम करीत असतांना देखील कोणताही लोभ न बाळगता सदरची सोन्याची अंगठी पोलीस ठाणेस येवून मुळ मालकास परत करुन मानुसकीचे उत्तम उदाहरण जनतेसमोर ठेवले आहे. त्यांचे उत्कृष्ट कामाची वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महेश बोळकोटगी, मुंढवा पोलीस ठाणे यांनी दखल घेवून त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला आहे.

सदरची कामगिरी, मा. पो-लीस आयुक्त, अमितेश कुमार, पुणे शहर, मा. पोलीस सह आयुक्त, प्रविण पवार, पुणे शहर मा. अपर पोलीस आयुक्त, मनोज पाटील, पुर्व प्रादेशिक विभाग,

पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उपआयुक्त, आर. राजा, परिमंडळ- ५, पुणे शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त, अश्विनी राख, हडपसर विभाग, पुणे शहर यांचे सुचनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महेश बोळकोटगी, पोलीस उप-निरीक्षक, अर्जुन नाईकवाडे, पोलीस अंमलदार सचिन अडसुळ व इतर स्टाफ यांनी केली आहे.

## भटक्या विमुक्त जमातीच्या मतदार नोंदणीबाबत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून आढावा

**पुणे :** राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी जिल्ह्यातील भटक्या विमुक्त जमातीसाठी काम करणाऱ्या संस्थांसोबत चर्चा करुन जास्तीत जास्त मतदार नोंदणीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे, शे-वराई सेवाभावी संस्थेचे नामदेव भोसले व क्रांती संस्थेच्या सुनीता भोसले आदी उपस्थित होते.

देशपांडे म्हणाले, पुणे जिल्ह्यात भटक्या विमुक्त जमातीसाठी शिरुर व इंदापूर तालुक्यात घेण्यात आलेल्या मतदार नोंदणी शिबीरांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पारधी समाजाच्या मतदार नाव नोंदणीसाठी १८ जिल्ह्यांमध्ये काम सुरु आहे. त्यामुळे निश्चितच मतदार नोंदणी वाढेल. प्रत्येक तालुक्यात या जमातीच्या नागरिकांची यादी तयार करुन नाव नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत,असेही ते म्हणाले. श्री. देशपांडे यांनी मतदार नाव नोंदणीसाठी येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या.

शिबीरांद्वारे भटक्या विमुक्त जमातीच्या नागरिकांना शिधापत्रिका, आधार कार्ड, जातीचे दाखले देण्याची सुविधाही देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी सांगितले. अशा प्रकारची शिबीरे जिल्ह्यात विविध ठिकाणी घेण्यात येतील असेही ते म्हणाले.

# लोकसभा निवडणुकीची तयारी; पोलीस आयुक्तांकडून मतदान केंद्रांची पाहणी



**पिंपरी :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी तयारी सुरू केली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जास्त बूथ संख्या असलेल्या तीन मतदान केंद्रांची पाहणी केली. मार्चच्या पंधरवड्यात लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने निवडणूक आयोग, पोलीस आणि अन्य सर्व विभागांनी तयारी सुरू केली आहे. पिंपरी-चिंचवड पो-लीस आयुक्तालयाच्या हद्दीत तीन लोकसभा मतदारसंघाचा भाग येतो. मावळ लोकसभा मतदारसंघात पिंपरी, चिंचवड, निगडी, देहूरोड, रावेत, वाकड, तळेगाव, तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचा काही भाग येतो. तर, शिरूर लोकसभा मतदारसंघातील भोसरी, एमआयडीसी भोसरी, चिखली, दिघी, आळंदी, चाकण, महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यांचा भाग येतो. तर, हिंजवडी पोलीस ठाण्याचा काही परिसर बारामती लोकसभा मतदारसंघात येतो. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांना निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या उपाययोजना कराव्या लागणार आहेत. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गुरुवारी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक बूथसंख्या असलेल्या मतदान केंद्रांना भेट दिली.

# बंड गार्डन, कोरेगांव पार्क वाहतुक विभागाअंतर्गत वाहतुकीत प्रायोगिक तत्वावर बदल

**पुणे :** बंडगार्डन, कोरेगांव पार्क वाहतूक विभागाअंतर्गत साधुवासवानी पुलाचे काम बांधून पुर्ण होईपर्यंत कोरेगांव पार्क, बंडगार्डन वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये वाहतूक कोंडी टाळण्याच्यादृष्टिने व परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्याकरीता पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर यांनी कोरेगांव पार्क व बंडगार्डन वाहतुक विभागाचे हद्दीतील वाहनांच्या वाहतूकीत दुसऱ्या टप्प्याअंतर्गत प्रायोगिक तत्वावर बदल करण्याचे आदेश पारित केले आहेत.

बंडगार्डन, कोरेगांव पार्क वाहतुक विभागाअंतर्गत पर्णकुटी चौक ते ब्ल्यू डायमंड चौक ते मोबोज चौक, मोबाज चौक ते महात्मा गांधी उद्यान चौक (बंडगार्डन रोड), अलंकार चौक ते आय.बी. चौक ते सर्किट हाऊस चौक ते मोर ओढा चौक, मोर ओढा चौक ते कौन्सिल हॉल चौक व कौन्सिल हॉल चौक ते साधुवासवानी पुतळा मार्ग एकेरी करण्यात येत आहे. तर काहुन रोड जंक्शन ते तारापुर रोड जंक्शन हा रस्ता पुर्वीप्रमाणेच एकेरी मार्ग राहिल.

नगर रस्त्यावरून मोर ओढा चौकाकडे जाणारी वाहने पर्णकुटी चौक, महात्मा गांधी चौक, ब्ल्यु डायमंड चौक उजवीकडे वळून मंगलदास रोडने मीबोज चौक, डावीकडे वळून मंगलदास चौकी समोरुन पुन्हा डावीकडे वळून आय बी. (रेसीडेन्सी क्लब) चौक, डावीकडे वळून सर्किट हाऊस चौक, मार्गे मोर ओढा चौकाकडे, मोर ओढा चौक कोरेगाव पार्ककडे जाणारी वाहने मोर ओढा चौक, सरळ कौन्सिल हॉल चौक, उजवीकडे वळून मंगलदास चौक, उजवीकडे वळून बंडगार्डन रोडने महात्मा गांधी उद्यान चौक, उजवीकडे वळून कोरेगाव पार्ककडे जातील.

पुणे स्टेशन येथून कोरेगाव पार्ककडे जाणारी वाहने पुणे स्टेशन, अलकार चौक, डावीकडे वळून जहाँगीर चौक, उजवीकडे वळून मंगलदास चौक, पुणे स्टेशन अलंकार चौक सरळ आय बी चौक, डावीकडे वळून मगलदास चौक, उजवीकडे वळून बंडगार्डन रोडने महात्मा गांधी उद्यान चौक, उजवीकडे वजून कोरेगांव पार्क पुणे स्टेशन ते घोरपडीकडे जाणारी वाहने पुणे स्टेशन ते अलंकार चौक सरळ सर्किट हाउस चौक मार्गे मोर ओढा चौक, मार्ग इच्छितस्थळी जातीत.

घोरपडी व भैरोबानाला चौकामधुन येणा-या सर्व बसेस (पीएमपीएमएल सह) मोर ओढा चौकाकडुन सरळ जाऊन काहुर रोड जंक्शन वरुन डावीकडे वळण घेवुन तारापुर रोड जंक्शन वर येतील व उजवीकडे वळण घेवुन तारापुर रोडने ब्लु लाईन चौकाकडून उजवीकडे वळण घेवुन कॉन्सिल हॉल चौक मधून इच्छितस्थळी जातील. आय. बी (रेसिडेन्सि क्लब) जंक्शन ते मोर ओढा चौक हा एकेरी मार्ग आवश्यक त्यावेळेस तात्पुरता दुहेरी करण्यात येईल.

या मार्गावर अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व प्रकारच्या जड, अवजड, मल्टीॲक्सल वाहनांना २४ तास बंदी करण्यात येत आहे, असेही वाहतुक पोलीस उप-आयुक्त शशिकांत बोराटे यांनी कळविले आहे.

## मनोज जरांगे आणि बारसकर महाराजांचा वाद हा वैयक्तिक, त्यात सरकारचा काडीमात्र संबध नाही : मंत्री उदय सामंत



**पिंपरी चिंचवड :** मनोज जरांगे पाटील आणि अजय बारसकर महाराज यांच्यातील वाद हा वैयक्तिक असून त्यामध्ये सरकारला खेचू नये. त्या दोघांमधील वाद हा वैयक्तिक असून त्यात सरकारचा काडीमात्र संबंध नाही. त्यात सरकारला पडण्याची गरज नाही. त्यांच्या या वादात नाहक सरकारला ओढू नये, अशी प्रतिक्रिया मंत्री उदय सामंत यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

मराठा समाजाला शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सरकारने टिकणारे आरक्षण दिले. तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत हे आरक्षण दिल्याचे उदय सामंत म्हणाले. पुण्यामध्ये इंडिया आघाडीच्या मेळाव्यावर बोलताना इंडिया आघाडीने त्यांचा पंतप्रधानपदाचा उमेदवार जाहीर करून दाखवावा, असे सामंत यांनी आव्हान केले. दरम्यान, गुजरातमध्ये महानंदा डेअरी जाणार असल्याच्या चर्चेवर त्यांनी बोलण्यास नकार दिला.

# शिवगर्जना महानाट्याला पहिल्याच दिवशी पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात महानाट्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सुरुवात





**पुणे :** मंचासमोरून जाणारे हत्ती, घोडे, उंट....मोगलांचे आक्रमण आणि चित्तथरारक अंगावर शहारे आणणाऱ्या लढाया.....महाराष्ट्राची वारकरी परंपरा, लोकसंस्कृती, सह्याद्रीचा रांगडेपणा... तळपत्या तलवारी, ढाल, भाले, धनुष्यबाण.... स्वराज्यासाठी जीवनाची आहुती देणाऱ्या मावळ्यांचा पराक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रताप....जणू शिवकालीन इतिहास दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी महाविद्यालयाच्या मैदानावर अवतरला. निमित्त होते 'शिवगर्जना' महानाट्याचे.....

राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुणे जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त 'शिवगर्जना' महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत महानाट्याला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी या महानाट्याला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आमदार सुनील टिंगरे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, आमदार रामभाऊ मोझे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, माजी विशेष पोलीस महनिरीक्षक विठ्ठल जाधव, माजी महापौर मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शिवगर्जना महानाट्याच्या आयोजनाबाबत संदेश यावेळी ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आचरणात आणून देशासाठी योगदान देण्याचे आवाहन डॉ. पुलकुंडवार यांनी उद्घाटन प्रसंगी केले.

ते म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती होण्यासोबत त्यांच्या कार्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी यासाठी शासनाच्यावतीने वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'शिवगर्जना' या महानाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आजच्या काळात आपण प्रदूषण, रोगराई, दारिद्र्य, बेरोजगारी विरुद्ध लढले पाहिजे, असे आवाहन डॉ. पुलकंडवार यांनी केले.

आमदार टिंगरे म्हणाले, पुणे जिल्हा हा शिवरायांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या भूमीत त्यांचा पराक्रम सांगणारे शिवगर्जना महानाट्य होत असून नागरिकांनी याचा लाभ घ्याव, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.चव्हाण यांनी केले. ते म्हणाले, पुढच्या पिढीच्या मनावर छत्रपतींचा विचार आणि कार्याचा आदर्श बिंबविण्यासाठी सर्वांनी हे महानाट्य अवश्य पहावे आणि हे ऐतिहासिक वर्ष साजरे करण्यात सहभागी व्हावे, असे ते म्हणाले.

**भव्य मंचावर साकारला शिवकालीन इतिहास**

देखण्या आणि भव्य मंचावर पौर्णिमेच्या चंद्राच्या साक्षीने शिवरायांची भव्य दिव्य शौर्यगाथा ऐतिहासिक प्रसंगाद्वारे कलाकारांनी ताकदीने सादर केली. देशप्रेम जगविणारे संवाद, ताकदीचा अभिनय, ऐतिहासिक प्रसंगांना साजेसे नेपथ्य, प्रसंगानुरूप गीत-नृत्य आणि संगीत यामुळे त्यात छत्रपतींच्या पराक्रमासोबत महाराष्ट्राच्या संस्कृतीचे सुंदर दर्शनही घडले. स्वराज्याची शपथ, अफजलखान वध, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक सोहळा अशा अनेक प्रसंगातून इतिहास प्रेक्षकांच्या समोर उभा राहिला. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी कलाकारांना टाळ्या वाजवून दाद दिली.

महानाट्याच्यावेळी संपूर्ण परिसर यावेळी जय भवानी... जय शिवाजी.. जय छत्रपती शिवाजी महाराज की जय घोषणेने दुमदुमला. नागरिकांनी महानाट्य पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

'शिवगर्जना' महानाट्याचे २६ तारखेपर्यंत भव्य आयोजन करण्यात आले असून नागरिकांना हे महानाट्य विनाशूल्क पाहता येणार आहे. जिल्हा प्रशासनाने प्रथम येणाऱ्याला प्रथम प्राधान्य देण्याचे ठरवले असून प्रवेशिकांची गरज असणार नाही. जिल्ह्यातील सर्व नागरिक, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

# पंचांशी वाद घालणं पडलं महागात

## श्रीलंकेच्या कर्णधारावर आयसीसीची मोठी कारवाई



श्रीलंकेचा कर्णधार वानिंदू हसरंगा याला आयसीसीने दोन सामन्यांसाठी निलंबित केले आहे. याशिवाय त्याला मॅच फीच्या ५० टक्के दंडही ठोठावण्यात आला आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेतील शेवटच्या टी-२० सामन्यात हसरंगाने पंचांच्या निर्णयाला विरोध केला होता, त्यामुळे आयसीसीने त्याच्यावर कारवाई केली आहे. पुढील महिन्यात बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या टी-२० मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये हसरंगाला श्रीलंका संघाचे प्रतिनिधित्व करता येणार नाही.

**नक्की काय घडलं?**

अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील शेवटचा टी-२० सामना निर्णायक वळणावर होता. श्रीलंकेला विजयासाठी ३ चेंडूत ११ धावांची गरज होती. त्यावेळी वफादार मोमंदने उंच फुलटॉस चेंडू टाकला. यावर अंपायर हॅनिबलने नो बॉलचा इशारा दिला नाही. त्यावेळी श्रीलंकेसाठी कमिंडू मेंडिस फलंदाजी करत होता. हा चेंडून कामिंदू सरळ उभा असला असता, तरी चेंडू त्याच्या कमरेच्यावरून गेला असता, तरीही अंपायरने त्याला नो बॉल म्हटले नाही.

पंचांच्या या निर्णयावर कर्णधार वानिंदू हसरंगाला प्रचंड राग आला आणि त्याने निषेध केला. त्याच्या मते, आंतरराष्ट्रीय सामन्यात असे होऊ नये आणि त्याने मैदानात येऊन पंचाशी वाद घातला. त्यामुळे आयसीसीने त्याच्यावर दोन सामन्यांची बंदी घालण्याचा निर्णय घेतला.या सामन्यात श्रीलंकेला ३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

**काय म्हणाला वानिंदू हसरंगा?**


अंपायरच्या निर्णयाबाबत हसरंगा म्हणाला होता, आंतरराष्ट्रीय सामन्यात अशा गोष्टी घडू नयेत.

# 'अंपायर्स कॉल'मुळे भारताचे मोठे नुकसान, तबबल सात निर्णय टीम इंडियाच्या विरोधात

भारत आणि इंग्लंड यांच्यातील रांची कसोटीत 'अंपायर्स कॉल'मुळे भारतीय चाहते चांगलेच संतापले आहेत. वास्तविक, रांची कसोटीच्या पहिल्या डावात भारताचे चार फलंदाज अंपायर्स कॉल'मुळे बाद झाले. हे पाहिल्यानंतर भारतीय चाहते सोशल मीडियावर अंपायर्सवर आपला राग काढत आहेत. खरे तर, चौथ्या कसोटीच्या पहिल्या डावात भारताने 'अंपायर्स कॉल'मुळे शुबमन गिल, रविचंद्रन अश्विन, रजत पाटीदार आणि आकाश दीप यांना एलबीडब्ल्यू बाद दिले. यानंतर रांची कसोटीतील अंपायरिंगवर चाहते अनेक प्रश्न उपस्थित करत आहेत.

**'अंपायर्स कॉल'चा टीम इंडियाला फटका**

टीम इंडियाने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ७ विकेट्स गमावल्या होत्या. त्यापैकी तीन फलंदाज 'अंपायर्स कॉल'चे बळी पडले. त्याचवेळी तिसऱ्या दिवशी खालच्या फळीतील वेगवान गोलंदाज आकाशदीपही 'अंपायर्स कॉल'च्या जाळ्यात अडकला. शुबमन गिल, रजत पाटीदार आणि आर अश्विन यांच्या यादीत सामील झाला. शुबमन गिलला अंपायरने एलबीडब्ल्यू आऊट दिले होते. त्यानंतर रिप्लेमध्ये पाहिल्यानंतर त्याला



'अंपायर्स कॉल'मुळे बाद घोषित करण्यात आले.

यानंतर आर अश्विन आणि रजत पाटीदारही 'अंपायर्स कॉल'चा फटका बसला. त्याचवेळी तिसऱ्या दिवशी आकाश दीपलाही अंपायरने एलबीडब्ल्यू आऊट दिल्यानंतर रिप्लेमध्ये पाहून देखील 'अंपायर्स कॉल'मुळे आकाश दीपला त्याची विकेट गमवावी लागली. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा रॉड टकर आणि श्रीलंकेचा कुमार धर्मसेना मैदानावर पंच म्हणून काम पाहत आहेत.

**इंग्लंड संघाला अंपायर्स कॉलचा झाला फायदा**

पंचांचे चुकीचे निर्णय केवळ फलंदाजीतच नव्हे तर गोलंदाजीतही दिसून आले, त्यामुळे भारताने तिन्ही रिव्ह्यू लवकर गमावले. 'अंपायर्स कॉल'चा इंग्लंडला फायदा झाल्याने त्याचा परिणाम टीम इंडियावर दिसून आला. टीम इंडिया गोलंदाजी करतानाही पंचाचे तीन चुकीचे निर्णय दिसले. 'अंपायर्स कॉल'मुळे सलामीवीर बेन डकेट बचावला.

यानंतर पंचांनी ओली पोप आणि जॉनी बेअरस्टो यांच्यावरही मेहरबानी केली. मात्र, टीम इंडियाला रिव्ह्यूद्वारे विकेट मिळाली. रिप्लेच्या वेळी अंपायर्स कॉल घेतला असता, तर रोहित आणि कंपनीचे मोठे नुकसान झाले असते. मात्र, टीम इंडियाला रिव्ह्यूद्वारे विकेट मिळाली. एवढेच नाही तर अंपायरने ऑली रॉबिन्सनलाही आऊट दिले नाही. त्यावेळी तो केवळ ८ धावांवर फलंदाजी करत होता. रॉबिन्सनने जो रूटला साथ दिली आणि ५८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या दोन्ही फलंदाजांनी इंग्लंडला ३५३ धावांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**नेमणे आहे**

साप्ताहिक 'परिवर्तनाच्या पाऊलखूणा' या वृत्तपत्रावर महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांवर जिल्हा संपादक व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. नियम, अटी व शुल्क लागू.

संपर्क : ९६२३५३६३८८, ८४४६९५७६७३